## बोदवड महाविद्यालयात प्राचार्य - विद्यार्थी संवाद उपक्रम
## प्राचार्य दुस-या व चौथ्या शनिवारी तक्रारी ऐकुन घेणार
### विद्यार्थ्यांच्या हस्ते उदघाटन

- प्राचार्य अरविंद चौधरी

विद्यार्थी हा शैक्षणिक क्षेत्रातील महत्वपुर्ण घटक असुन महाविद्यालयाच्या विकासासाठी विद्यार्थ्यांचे मत महत्वपुर्ण असल्याने महाविद्यालयातील सुविधा, अध्यापन पद्धती, शिस्त, स्वच्छता, विविध उपक्रम या बाबत विद्यार्थ्यांनी सुचना करणे मागणी करणे हा त्यांचा अधिकार आहे व विद्यार्थ्यांच्या अपेक्षा पुर्ण करणे महाविद्यालयच्या प्राचार्यचे कर्तव्य आहे या उपक्रमाअंतर्गत नियोजित दिवशी आपण विद्यार्थ्यांचे म्हणणे एकुन घेणार असल्याचे व त्वरीत कार्यवाही करणार असे प्रतिपादन महविद्यालयाचे प्राचार्य अरविंद चौधरी यांनी प्राचार्य-विद्यार्थी उपक्रमाच्या उधघाटन समयी व्यक्त केली.

कला वाणिज्य व विज्ञान माविद्यालय बोदवड येथे प्राचार्य- विद्यार्थी संवाद उपक्रमाचे उदघाटन दि.24 ऑगष्ट 2018 रोजी महाविद्यालयाचे जेष्ठ विद्यार्थी श्री विशाल माळी, हर्षल उगले, कु.तेजस्विनी सोनार यांच्या हस्ते या उपक्रमाच्या फलका समोर नारळ फोडून करण्यात आले.

प्राचार्यांची ही योजना विद्यार्थ्यांचा सन्मान करणारी असुन आम्हास आमचे विचार खुल्या मनाने व्यक्त करण्याची संधी आहे असे वाटते अशी भावना कु.तेजस्विनी सोनार या विद्यार्थ्यीनीने व्यक्त केली. या उपक्रमाबाबत महाविद्यालयाचे प्राचार्य अरविंद चौधरी यांचे विद्यार्थी वर्गात आनंद व्यक्त होत आहे.

कार्यक्रमस उपप्राचार्य डी.एस.पाटील,डॉ.मधुकर खराटे, डॉ.किशोर पाठक,डॉ.चंद्रस, डॉ.व्ही.पी.चौधरो, प्रा. अजय पाटील ,डॉ पी.एस.महाले,प्रा.रत्ना जवरास, डॉ.रुपेश मोरे, डॉ.पी.एन पाटील यांचेसह महविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.






